Vol 6 Issue 4 October 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 4 | October - 2016

GRT Golden Research Thoughts

# "चार्वाकांचा वैज्ञानिक दृष्टिकोन"

**Shri Vikas Bhimashankar Gaikwad**
Lecturer Philosophy Dpt. D.B.F. Dayanand Collage of Art & Sciences
Solapur.



## प्रस्तावना :-

चार्वाक दर्शनाला 'लोकायत', ब्राहस्पत्य' दर्शन अशा नावांनी ओळखले जाते. चार्वाक दर्शन हे शुद्ध स्वरूपात नास्तिक दर्शन आहे. इतर दर्शने जी जैन आणि बौद्ध यांना नास्तिक दर्शन म्हणतो. कारण ते वेद मानत नाहीत. सृष्टीचा निर्माण कर्ता असा ईश्वर त्यांना मान्य नाही. म्हणून या दर्शनांना नास्तिक दर्शन असे म्हटले जाते.

चार्वाक शब्दाचा संधि–विच्छेद करून पहिला तर चारू + वाक् = चार्वाक या मधील चारू या शब्दाचा अर्थ सुन्दर असा आणि वाक् म्हणजे वाणी अथवा बोलणे – बोलणारा अर्थात सुन्दर बोलणारा, त्याच बरोबर मधुरभाषी असा सुद्धा चार्वाक शब्दाचा अर्थ होऊ शकतो. मधुरभाषी हिटनी यांनी म्हटले आहे. चार्वाकांना 'व्यक्तीविशेष' संप्रदाय किंवा ज्यांचे वचन आणि उपदेश हे सुंदर आणि मनोरम असतात. काहींच्या मते 'लोकायत' याचा अर्थ विचारशून्य प्रकारचे आचरण करतात. तर या दर्शनाला 'वितण्डवादक ' मत म्हणून सुद्धा उल्लेख केला आहे. चट्टोपाध्याय यांच्या मते लोकायत याचा अर्थ 'भौतिकदर्शन' किंवा 'लोकदर्शन' अशा प्रकारे स्विकारलेले आहे. भौतिक दर्शन म्हणजे आपल्या समोरील असणाऱ्या भौतिक घटकाबद्दल विचार करणारे दर्शन यास भौतिक दर्शन म्हणतात तर लोकदर्शनातील 'लोक' म्हणजे इंद्रिय आणि इंद्रियानुभवार असणारे दर्शन म्हणजे 'लोकदर्शन' होय. 'राधाकृष्णन' यांच्या मते जे कोणी भौतिकवादी असतील त्यांना राधाकृष्णन यांनी 'लोकायतील' असे म्हटले आहे. लोक म्हणजे इहलोक, आणि आयत म्हणजे आधारित म्हणून इहलोकावर आधारित असा आहे. चार्वाक हा या लोकायत मताचा प्रवर्तक मानला जातो. म्हणून 'चार्वाक' दर्शनाचा प्रणेता चार्वाक आहे.

राहुल सांकृत्यायन यांच्या मतानुसार चार्वाक हे कोणतेही विचार, मत, दर्शन किंवा प्रवर्तक नसुन जे लोक परलोक, पुनर्जन्म, पाप, पुण्य, स्वर्ग, नरक आणि मोक्ष असे पारलौकिक जीवन जे स्विकारीत नाहीत किंवा मानत नाही, त्यांना चार्वाक असे म्हणतात. आनंद झा याच्या मते, 'चार्वाक' हे 'चार्वाक्क' या शब्दाचा अपभ्रंश आहे. राज्यदर्शनामध्ये राज्य–प्रशासन कसे असावे, कशा प्रकारे राज्यकारभार करावा हे राज्यदर्शनामध्ये एक मापदंड नियम दिलेले असतात. राज्यांतर्गत समाज, संस्था आणि व्यक्ती येतात. याचे विवेचन राजदर्शन मध्ये केलेले असते. एकंदरीत चार्वाक दर्शन हे 'राजनीति दर्शन' आहे.

'बृहस्पती' हा चार्वाक दर्शनाचा आद्यप्रवर्तक म्हणून मानला जातो. यामुळे या दर्शनाला 'ब्राहस्पत्य' दर्शन या ही नावाने ओळखले जाते. 'लोकायत दर्शन' याही नावाने या दर्शनाची ओळख आहे. लोकायत याचा अर्थ लोकांना म्हणजे सर्वसामान्य लोकांना मान्य होणारे, त्यांच्यात 'प्रसुत' असलेले (लोके आयतम) ते लोकायत मत असा अर्थ असू शकेल किंवा लोक म्हणजे इहलोक; आयत म्हणजे आधारित असणारे ज्ञान म्हणजे लोकायत असु शकते. दुसरे 'लोक' म्हणजे 'इंद्रिय' अशा अर्थाने इंद्रियापुढे पसरलेले गोचर विश्व तेवढेच सत्य मानणारे मत म्हणजे 'लोकायत' होय.

'चार्वाक' मत थोडया उशिराने मिळालेले नाव होय. बहुधा हे व्यक्तीनाम असावे याने या मताचे प्रचार किंवा फेरमांडणी केली असावी. इसवी सन आठव्या शतकापासून 'चार्वाक' हे नाव सर्रास येते. त्या अगोदर 'ब्राहस्पत्य', 'लोकायत', कौटिल्याचे अर्थशास्त्र हीच नावे रूढ होती किंवा या नावाने हे दर्शन ओळखले जात होते.

## चार्वाक ज्ञानमीमांसा :–

चार्वाकांनी फक्त 'प्रत्यक्ष' आणि 'लोकप्रसिद्ध', 'लोकप्रसुत' अनुमान मान्य केले आहे. ज्ञान मिळविण्याची इतर प्रमाणे उपमान, शब्दप्रमाण, अर्थापत्ति आणि अनुपलब्धि ही प्रमाणे स्विकारली नाहीत. 'प्रत्यक्षमेवप्रमाणम' असे ज्ञान की जे प्रत्यक्षाने मिळते, म्हणजेच पंचेद्रियांनी होईल असे सत्यज्ञान. जे जे ज्ञान आपल्या इंद्रियाद्वारे होणारे प्राप्त ज्ञान जसे जिभेमुळे आपल्याला पदार्थ गोड आहे की आंबट, नाकामुळे सुवासिक फुलांचा वास घेतो, समोर जगात घडणाऱ्या गोष्टी आपण डोळयामार्फत पाहत असतो, स्पर्श ज्ञानाने वस्तु मऊ आहे की खडबडीत याचे ज्ञान आपल्याला स्पर्शाने होत असते. कानाच्या साहाय्याने आवाज ऐकत असतो. अशा प्रकारचे इंद्रियजन्य ज्ञान असते ते केवळ प्रत्यक्ष प्रमाणाद्वारे मिळत असते.

'लोकप्रसिद्ध अनुमान' प्रमाण चार्वाकांनी तेवढेच घ्यावे असे सांगितले आहे. 'लोक' या शब्दाचा अर्थ संस्कृत मध्ये इंद्रियविषयक आणि 'प्रसिद्ध' म्हणजे सिद्ध यामुळे चार्वाकानी फक्त

'लोकप्रसिद्ध अनुमान' प्रमाणाद्वारे स्विकारलेले आहेत. या वरून असे स्पष्ट होते की, 'इंद्रियविषयाने जे ज्ञान सिद्ध करता येऊ शकते असे आणि त्यामध्ये 'अलौकिक' व 'अतींद्रीय' विषय अनुमान प्रमाणाद्वारे स्विकारीत नाहीत कारण आत्मा, पापपुण्य, पुर्वजन्म, पुनर्जन्म, मोक्ष इ. विषय अलौकिक व अतींद्रय आहेत. त्यामुळे ते लोकप्रसिद्ध अनुमान प्रमाणामध्ये येत नाहीत म्हणून चार्वाक दर्शन 'लोकप्रसिद्ध अनुमान प्रमाण' फक्त स्विकारतात ते एका मर्यादेपर्यंतच.

### *चार्वाकांचे नीतिविषयक विचार :–*

चार्वाक प्रत्यक्ष इंद्रियानुभवावर असणारे विषय स्विकारल्यामुळे ते भौतिक  समर्थक ठरतात. भारतीय दर्शनात विविधरित्या युक्तीच्या उद्देशाने आपापले चिंतन केलेले आहे. भारतीय दर्शनांचे परम गंतव्य 'मुक्ती' होय. प्रत्येक दर्शनात या मुक्तीचे नावे आणि ते मिळविण्यासाठी विविध प्रकारचे मार्ग सांगितले आहेत. या मुक्तीला कधी त्यास 'मोक्ष'. तर कधी 'कैवल्य' किंवा 'निर्वाण' या विशिष्ट शब्दांची उपयोजना करण्यात आली आहे. चार्वाक दर्शनामध्ये मुक्तीचा मार्ग अवलंबलेला नाही. म्हणून चार्वाक सोडून सर्व दर्शने 'मोक्षवादी' आहे. चार्वाक 'मोक्षवादी' ठरत नाहीत.

चार्वाक भौतिक समर्थक असल्यामुळे त्यांच्या या भौतिकवादाचा परिणाम त्यांच्या नीतिशास्त्रांवर झालेला आहे. पंच महाभुतांमधील पृथ्वी, जल, तेज आणि वायु हे चारच महाभुते त्यांनी स्विकारली आहेत. आकाश हा पाचव्या तत्वाला स्विकारले नाही कारण त्याचा कोणताही प्रत्यक्ष इंद्रिय अनुभव मिळत नाही. पुढे जावुन काही चार्वाकांनी आकाश तत्व स्विकारले ते शब्दावर आधारित ध्वनी या गुणधर्मावर म्हणून चार्वाक शुद्धस्वरूपाने 'भौतिकवादी' ठरतात.

या भौतिकवादाचा आणि इंद्रियनुभववादाचा दृष्टीने पाहिल्यास त्यांनी आत्मा स्विकारला नाही. आत्माच नाकारल्यामुळे पुर्वजन्म आणि पुनर्जन्म नाकारणे क्रमप्राप्त झाले. त्या अनुषंगाने येणारे 'कर्मबंध' आणि 'कर्मफल' हया गोष्टी सुद्धा त्यांनी नाकारल्या आहेत. चार्वाकांनी देहाहुन भिन्न असा आत्मा नाकारलेला आहे. मनुष्याच्या मृत्युनंतर आत्म्याचे अस्तित्व संपुष्टात येते असे चार्वाक मत आहे. आत्मा शरीर सोडून इतर देह धारण करतो. याचाच अर्थ पुनर्जन्म असतो तसा पुर्वजन्म आहे. त्याचबरोबर परलोक आहे. मनुष्याच्या ज्याच्यात्याच्या कर्मानुसार त्याला स्वर्ग–नरक प्राप्त होत असतो असे कर्मसिद्धांतामध्ये सांगितले आहे. अशा गोष्टी चार्वाकांना मान्य नाहीत. त्यांनी मुळातच आत्म्याचे अस्तित्वच नाकारलेले आहे. कारण आत्म्याचे अस्तित्व हे कोणत्याही ज्ञानाने सिद्ध करता येत नाही. त्यामुळे पुर्वजन्म व पुनर्जन्म असुच शकत नाही. मृत्युनंतर मनुष्याला प्राप्त होणारा स्वर्ग–नरक अशी पारलौकिक संकल्पना आहे असा स्वर्ग वा नरक कोणी पाहीलाय? याविषयी कोणी अनुभव घेतला आहे का? तर नाही. मृत्युनंतर मनुष्याचे अस्तित्वच संपुर्णपणे नष्ट होते. असे चार्वाक मत आहे.

यामुळे पुर्वजन्म–पुनर्जन्म आणि स्वर्ग–नरक चार्वाक नाकारतात. कर्मबंध आणि कर्मफल हे वैदिक संकल्पना आहे. चार्वाकांनी वेद मानले नाहीत कारण वेद 'शब्दप्रामाण्य' असल्यामुळे, चार्वाक 'प्रत्यक्ष' या प्रमाणाचा स्विकार करतात. कर्मबंध आणि कर्मफल हया वेदातील संकल्पना असल्यामुळे त्या स्वीकारीत नाहीत.

चार्वाकांचा पुरूषार्थ विचार स्पष्ट केला तर धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष चार्वाक सोडून इतर दर्शनांनी हे चार पुरूषार्थ मानले आहेत. चार्वाकांनी फक्त अर्थ आणि काम पुरूषार्थ स्वीकारला तर धर्म आणि मोक्ष नाकारला. धर्म य पुरुषार्थामध्ये असलेले कर्मकांड, कर्मफल सिद्धांत हे विचार पारलौकिक आहेत. चार्वाक इहवादी आहेत. त्यांना पारलौकिक विचार मान्य नाहीत कारण ते कोणत्याही प्रकारे अनुभवास न येणारे आहेत. त्यामुळे चार्वाक 'धर्म' पुरूषार्थ स्वीकारला नाही. 'मोक्ष' पुरूषार्थ नाकारताना, मोक्षाचा सर्व साधारण अर्थ जन्म–मरणाच्या चक्रातून सुटका व दुःखापासून मुक्ती म्हणजे 'मोक्ष' होय. आत्मा चार्वाकांनी नाकारला आहे. मृत्यु नंतर सर्व काही संपते. मृत्यु म्हणजेच 'मोक्ष' आणि स्वातंत्र्य होय. मृत्युनंतर मनुष्याचा कोणताही पुनर्जन्म होत नसतो व कोणताही पुर्वजन्म नसतो. यामुळे चार्वाकांनी 'मो़क्ष' पुरूषार्थ नाकारलेला आहे. 'धर्म' आणि 'मोक्ष' या संकल्पना अलौकिक असल्याने वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिल्यास ते सफल होवू शकत नाहीत. म्हणून 'धर्म' आणि 'मोक्ष' पुरूषार्थ चार्वाकांनी नाकारलेला आहे.

'अर्थ'आणि 'काम' पुरुषार्थाचे समर्थन अशा रीतीने केले आहे की, ज्या प्रमाणे इतर दर्शनांमध्ये 'मोक्ष' हे 'परमप्राप्तव्य' मानले आहे, त्याप्रमाणे चार्वाकांनी 'अर्थ' पुरुषार्थ 'परमप्राप्तव्य' म्हणून मानला आहे. तर 'काम' पुरुषार्थ हा एकमेव पुरुषार्थ आहे, असे मानून मनुष्याच्या जीवनातील अंतिम ध्येय 'काम' आहे व तो एक मौलिक पुरूषार्थ म्हणून मानला आहे. अशा प्रकारे हे दोनच 'अर्थ' आणि 'काम' पुरुषार्थाचे समर्थन चार्वाकांनी केले आहे.

या रीतीने आत्मा, ईश्वर, स्वर्ग–नरक, पुर्वजन्म–पुनर्जन्म, पाप–पुण्य इ. गोष्टींचा विचार केला तर हया गोष्टींचा कोणत्याही प्रकारे आपल्या इंद्रियानुभद्वारे प्रचिती येत नाही. हया सर्व बाबी अस्तित्वात नाहीत. आपल्या समोर वर्तमानात जे प्रत्यक्ष आहे तेच आहे. भविष्याचा विचार करण्यात वर्तमान सोडून देवु नका अशी चार्वाकांची शिकवण आहे.

या मधुन चार्वाकांचा 'सुखवाद' मांडला गेला. मनुष्याने इहलोकीच जास्तीत–जास्त सुख उपभोगावे उदयाच्या चिंतेमध्ये आजचा दिवस व्यर्थ घालवू नका. 'पारलौकिक' व 'मोक्ष' मिळविण्याच्या इच्छेने सुखाकडे पाठ फिरवून बसू नका. वर्तमान हाच सत्य आहे. अशा प्रकारचा एक 'सुखवाद'च त्यांनी सांगितला आहे.

चार्वाकांनी सांगितलेल्या 'सुखवादाचा ' गैरसमज असा निर्माण झाला की, 'मनुष्याने स्वतःचेच सुख पहावे, इतरांच्या सुख–दुःखचा विचार करू नये', 'कर्ज काढून तुप–लोणी खावे' असा गैरसमज पसरला गेला. अशा प्रकारची अनैतिक शिकवण चार्वाक सांगता आहेत असा गैरसमज झाला. परंतु हे योग्य नाही. 'काढलेले कर्ज परत करू नये किंवा देवूच नये' अशी काही शिकवण त्यांनी कुठेही दिलेली नाही.

याउलट मनुष्याने गो–पालन, शेती, व्यापार–उद्योग या सारख्या 'सत' असणाऱ्या साधनांच्या आधारे अर्थार्जन करून आपल्या दैनंदिन जीवनातील गरजा पूर्ण कराव्यात. एक आदर्श व सुशिक्षित समाज तयार करावा. अशी एक नैतिक शिकवण त्यांनी दिलेली आहे. विज्ञानाचे स्वरूप आणि चार्वांकांचा दृष्टिकोन यामध्ये साम्य असल्यामुळे ''चार्वांकांचा दृष्टिकोण वैज्ञानिक'' ठरतो.

### *संदर्भ ग्रंथ :–*

1.चार्वाक इतिहास आणि तत्वज्ञान — प्रा. सदाशिव आठवले
2.अस्तिक शिरोमणी चार्वाक — आ. ह. साळुंखे
3.चार्वाक दर्शन सरिता — अनवर आगेवान
4.भारतीय तत्वज्ञान — श्रीनिवास दिक्षीत
5.God in the Charvaka System — Bhattacharya, Tarapd
6.Charvaka System — Mishra Umesh.



**Shri Vikas Bhimashankar Gaikwad**
**Lecturer Philosophy Dpt. D.B.F. Dayanand Collage of Art & Sciences Solapur.**

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org